फडणवीस यांना हायकोर्टाची नोटीस

सरकारी कर्मचाऱ्यांची बँक खाती ॲक्सिस बँकेत वळवल्याचा आरोप

वार्ताहर/नागपूर

मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांची खाती राष्ट्रीय बँकांमधून ॲक्सिस बँकेत वळवल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस व स्टेट बँक ऑफ इंडियाला नोटीस बजावली आहे. चार आठवड्यांत उत्तर देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार राज्याच्या मुख्य सचिवांनी परिपत्रक काढून सरकारी कर्मचाऱ्यांची एसबीआय व इतर राष्ट्रीयीकृत बँकांमधील खाती ॲक्सिस बँकेत वळती करण्याचा आदेश दिला होता, असा आरोप करणारी फौजदारी जनहित याचिका मोहनीश जबलापुरे यांनी हायकोर्टात दाखल केली होती. राज्यातील पोलिसांची बँक खाती तसेच संजय गांधी निराधार आवास योजनेच्या लाभार्थ्यांची खाती खासगी बँकेमध्ये उघडण्यास सांगितले. ॲक्सिस बँकेत फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस उच्च पदावर काम करतात.

नागपूर खंडपीठाचे न्यायाधीश सुनील शुक्रे आणि अनिल पानसरे यांनी या प्रकरणात देवेंद्र फडणवीस यांच्यासह ॲक्सिस बँक आणि स्टेट बँक ऑफ इंडियाला नोटीस बजावली आहे. तसेच, यापूर्वी झालेल्या सुनावणीत मुख्य सचिव, गृह विभाग आणि पोलिस महासंचालक यांना नोटीस बजावली होती. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना त्यांना पहिल्यांदा नोटिस बजावण्यात आली होती. परंतु, त्यानंतर त्यांचा पत्ता बदलला.

ते मुख्यमंत्री असताना ही नोटीस बजावण्यात आली होती. पण, तोपर्यंत त्यांचा राहण्याचा पत्ता बदलला. बुधवारी न्यायालयाने पत्ता बदलून त्यांना नव्याने नोटीस बजावली आहे.

जावयाला अटकपूर्व जामीन मंजूर

प्रतिनिधी/मुंबई

सासुशी जबरदस्तीने शारिरीक संबध ठेवल्याचा आरोप असलेल्या आरोपी जावयाला मुंबई हायकोर्टाने दिलासा देत अटकपूर्व जामीन मंजूर केला. न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांनी दोन वर्षापूर्वी दाखल केलेल्या तक्रारीची दखल घेतली. जर फिर्यादी सासूला आरोपीने शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडले तर तिने त्याच्याशी आपल्या मुलीचे लग्न कसे काय लावून दिले. आणि जावई म्हणून स्विकारले? ही बाब अशक्य आहे असे स्पष्ट करत हायकोर्टाने सासुच्या आरोपांवर शंका व्यक्त करत आरोपी जावयाला अटकपूर्व जामीन मंजूर केला.फिर्यादी शर्मीलाबाई (नावात बदल) आपल्या पती, दोन मुलींसह उल्हासनगरमधील एका अपार्टमेंटमध्ये राहत होत्या.

वैद्यकीय साहित्याचा पुरवठा करावा

नागपूर खंडपीठाचे राज्य सरकारला आदेश

वार्ताहर/नागपूर

नागपूरमधील कोरोनाबाधितांच्या संख्येत मोठी भर पडत आहे. शहर तिसऱ्या लाटेच्या उंबरठ्यावर असताना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात (मेडिकल) औषधे आणि सर्जिकल साहित्याचा साठा अपुरा आहे. संसर्ग वाढताना आणि या नव्या लाटेला तोंड देताना डॉक्टरांकडील आवश्यक ती साधनसामुग्री अपुरी असल्यास संपूर्ण राज्यावर आरोग्याचे संकट कोसळेल, अशी चिंता व्यक्त करत मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने तातडीने वैद्यकीय साहित्याचा साठा पुरवठा करावा असे आदेश राज्य सरकारला दिलेत.

मेडिकलमधील वैद्यकीय सुविधांसंदर्भात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यावर बुधवारी न्यायमूर्ती सुनील शुक्रे व अनिल पानसरे यांच्यासमक्ष सुनावणी झाली. सरकारी रुग्णालयांना साहित्य पुरविण्याची जबाबदारी हाफकिन इन्स्टिट्यूटकडे आहे. मेडिकलने त्यासाठी निधीही अदा केला आहे. मात्र, अद्याप मेडिकलला हे साहित्य प्राप्त झालेले नाही. यात औषधी, सर्वसामान्य सर्जिकल साहित्य, आयव्ही, आणि ग्लोव्हज यांचा समावेश आहे, अशी माहिती न्यायालयमित्र ॲड. अनुप गिल्डा यांनी न्यायालयाला दिली.

यावर न्यायालयानेसुद्धा नाराजी व्यक्त केली. या माहितीवरून प्रथमदर्शनी असे दिसून येते की, नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात राज्याची प्रशासकीय उतरंड कुठेतरी अपयशी ठरतेय. यामुळे तिसऱ्या लाटेशी सामना करणाऱ्या समाजाचे आणि वैद्यकीय क्षेत्राचे प्रयत्न व्यर्थ ठरू शकतात. आज शहरात ३५० तर राज्यात १९ हजार नव्या रुग्णांची भर पडली आहे.'एकीकडे बाधितांचा आकडा वाढत असताना दुसरीकडे वैद्यकीय क्षेत्राकडे पुरेशी साधन सामुग्री नसल्यास राज्यावर आरोग्याचे संकट कोसळू शकते आणि ते टाळायला हवे. त्यामुळे राज्य सरकारने यावर तातडीने कारवाई करीत आवश्यक त्या वस्तू उपलब्ध करून द्याव्यात', असे न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले आहे.

जे संबंधित असतील त्यांनाच

श्री. जयशिवा प्रकाश नायर हे ठाकुर गाव, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१ येथे स्थित **एन.जी. सनसीटी फेज III सी.एच.एस. लि. (सोसायटी)** चे सभासद आणि **सोसायटीच्या इमारत क्र. ४ च्या बी विंग मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. २०४** चे सह-धारक असून **त्यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता २१/०५/२०१६ रोजीस निधन झाले.**

सोसायटीच्या वतीने आम्ही याद्वारे सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाचे सदर शेअर्स आणि हितसंबंधाचे हस्तांतर होण्यास वारस किंवा दावेदार किंवा आक्षेपक यांच्याकडून दावे किंवा आक्षेप असल्यास ते सदर सूचनेच्या प्रसिध्दीपासून **७ (सात) दिवसात** सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्या/आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्यांच्या प्रतींसह मागवित आहे. वर दिलेल्या मुदतीत जर दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर सोसायटीच्या उपविधीतील तरतुदीमधील दिलेल्या मार्गाने सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाचे शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतर करण्यास सोसायटी मोकळी असेल आणि आम्ही ''ना दावापत्र'' जारी करु. जर, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदीनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल.

प्रेम पाण्डेय- वकील
कामधेनु असोसिएट्स-
वकील आणि विधि सल्लागार
#१३-१४, गोकुळ होरायझन, गुंडेचा
ट्रिलियम समोर, ठाकुर व्हिलेज,
कांदिवली (पूर्व), मुंबई-४०० १०१
दिनांक ०६/०१/२०२२ (८१४४)

जाहीर सूचना

माझ्या अशिलांच्या सूचनेअंतर्गत, मी **श्रीम. ऑड्री नटराजन** यांच्या नोंदणी जिल्हा आणि उप-जिल्हा मुंबई शहर आणि मुंबई उपनगरामधील डि'मेंटो रोड, बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०००५० येथे स्थित प्लॉट क्र. ६५, सी.टी.एस. क्र. सी/४१३ धारक मिळकतीवर उभारलेल्या ''पाम व्हिला'' इमारतीच्या ३च्या मजल्यावरील मोजमापित १,३४२ चौ. फू.चटई क्षेत्राच्या फ्लॅट क्र. ३०१ यासह उपरोल्लखित इमारतीमध्ये स्थित असलेल्या जमीनीमधील एक कार पार्किंग जागेचे हक्कदार आणि ''पाम व्हिला'' इमारतीमधील फ्लॅट मालकाच्या नावे सालसेट्टे कॅथलिक को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड च्या शेअर्समधील संबंधित हितसंबंध आहेत (यापुढे उपरोल्लिखित फ्लॅट, शेअर्स, एका कार पार्किंग जागेचे हक्क आणि संबंधित हक्क ''मिळकत'' म्हणून संदर्भित)

कोणाही व्यक्तीचे उपरोल्लेखित मिळकत किंवा त्याच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, गहाण, तारण, प्रभार, धारणाधिकार, भाडेपट्टा, वारसा, बक्षिस, विश्वस्त, निर्वाह, ताबा, सुविधाधिकार, कर्ज, अग्रीम, कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण, (महसुल किंवा लवाद) किंवा प्राधिकाऱ्यांद्वारे पारीत निषेधाज्ञा किंवा कोणताही हुकूम किंवा आदेश किंवा निवाडा किंवा विक्रीच्या कोणत्याही करारा अंतर्गत, किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाच्या नामाधिकाराच्या संदर्भात किंवा कोणताही दावा असल्यास त्यांनी ज्याद्वारे अशा हक्कांचा दावा केला अशा दस्तावेजाच्या सर्व प्रतींसह सदरहू तारखेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद पत्त्यावर निम्नस्वाक्षरीकारांना कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास असे कोणतेही दावे असल्यास, ते त्यागित आणि/किंवा परित्यागित समजले जातील आणि माझे अशिल उपरोक्त नमुद मिळकतीशी पुढील व्यवहार करतील.

मुंबई : ६ जानेवारी, २०२२
एस. रेगो
वकील,
होम- कमिंग ४७, वरोडा रोड,
बांद्रा (पश्चिम),
मुंबई ४०००५०

जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की आम्ही **श्री. आदित्य अजीत मेहता** यांचे गोदरेज बंगल्यासमोर, मिलिटरी रोड, जुहू, मुंबई - ४०००४९ येथे स्थित गाव जुहूच्या सीटीएस क्र. ७२/१० ए (भाग) धारक जमिनीवर बांधकामित मेघ अपार्टमेंटस् सीएचएस लि., अशा ज्ञात बिल्डिंग मधील ३ च्या मजल्यावर फ्लॅट क्र. ३०२ असलेली मिळकत त्यासह दिनांकीत २४ नोव्हेंबर, २००८ च्या प्रमाणपत्र क्र. १० अन्वये शेअर क्र. ४१ ते ४५ (दोन्ही समाविष्ट) धारक प्रत्येकी रु. ५०/- च्या सोसायटीच्या ०५ शेअर्स करिता नामाधिकार तपासत आहोत, जी **श्रीम. ममता अजीत मेहता** यांचे कायदेशीर वारसाच्या क्षमतेत **श्री. अजीत गोपालदास मेहता आणि कु. ईशा अजीत मेहता** यांच्याकडून सोडून देण्याचा विलेखान्वये संपादीत केली आहे.

अशी कोणतीही व्यक्ती वरील संदर्भित परिसर किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संबंधी विक्री, अदलाबदल, गहाण, प्रभार, भेट, निर्वाह, वारसा, कब्जा, भाडेपट्टा, कुळवहीवाट, धारणाधिकार, परवाना, जंगमगहाण, कोणत्याही विश्वस्तान्वये नामाधिकाराचे हस्तांतर किंवा लाभार्थी हितसंबंध, चिरभोगाचा हक्क, अग्रक्रयाधिकार किंवा अन्य कोणताही करारान्वये अथवा निकाली किंवा हुकुम, आदेश किंवा पुरस्कार किंवा अन्य कोणत्याही माध्यमातून कोणत्याही स्वरूपाचा दावा असल्यास तसे पुष्ठ्यर्थ दस्तावेजासह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकाराकडे त्यांचे कार्यालय ३१०, साई चेंबर्स, सांताक्रूझ रेल्वे स्थानक जवळ पूर्व, मुंबई ४०० ०५५ येथे ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या कालावधीत (दोन्ही दिवस धरून) सदर कळविण्यासाठी याद्वारे विनंती आहे, कसूर केल्यास अशा व्यक्तींचे दावे त्यागीत आणि/किंवा परित्यागीत समजण्यात येतील.

दिनांक : ०७ जानेवारी, २०२२
मेसर्स एके लीगल पार्टनर्स, ऍडव्होकेट्स

पुण्यात जम्बो कोविड सेंटर सुरू होणार

प्रतिनिधी/पुणे

पुणे शहरात कोरोना रुग्णसंख्या झपाट्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर शिवाजीनगर येथील जम्बो कोविड सेंटर पुन्हा सुरू करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. हे कोविड सेंटर येत्या दोन दिवसात सुरु होणार असून सुरुवातीला २०० बेड कार्यान्वित करण्यात येणार आहेत. अशी माहिती महापालिका आरोग्य प्रमुख आशिष भरती यांनी दिली.

शिवाजीनगर येथील सीओईपीच्या मैदानावर जम्बो कोवीड सेंटर उभारण्यात आले आहे. या सेंटरचा कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत चांगलाच फायदा झाला आहे. नागरिकांना चांगले उपचार मिळाले.

चंदन तस्कराला पोलिसांकडून अटक

प्रतिनिधी/पुणे

हवेली तालुक्यातील पेरणे येथून एका चंदन तस्करी करणाऱ्या एकास पोलिसांनी अटक केली आहे. लक्ष्मण भिमा गायकवाड असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून १०२ किलो ४०० ग्रॅम चंदनाचे तुकडे आणि एक कार असा एकूण पाच लाख ५९ हजाराचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपी गायकवाडविरोधात लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. गायकवाड याच्या कारमधून ओल्या चंदनाच्या लाकडाचे तुकडे जप्त करण्यात आले आहे. आरोपी गायकवाड हे कारने चंदन तस्करी करून विक्री व खरेदी करण्यासाठी पुण्यातील नगररोड परिसरात येणार अशी माहिती खंडणी विरोधी पथकाच्या पोलिसांना मिळाली होती.

साखर कारखान्यांचा साडेनऊ हजारांचा प्राप्तिकर माफ

केंद्र सरकारचा महत्वपूर्ण निर्णय

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

देशातील सहकारी साखर कारखानदारीला केंद्र सरकारने चांगला दिलासा दिला आहे. गेल्या ३५ वर्षापासून कारखान्यांना भेडसावणाऱ्या प्राप्तीकर आकारणीचा प्रश्न निकाली निघाला आहे. एफआरपी (रास्त व किफायतशीर भाव) पेक्षा अधिक ऊस दर देणाऱ्या साखर कारखान्यांना फरकावरील रकमेवर लागू केलेला सुमारे साडेनऊ हजार कोटी रुपयांचा प्राप्तीकर रद्द करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे.

एफआरपी, एसएमपी (किमान वैधानिक मूल्य) पेक्षा अधिक ऊस दर दिलेल्या साखर कारखान्यांना प्राप्तीकर विभागाने नोटिसा धाडल्या होत्या. वाढीव फरकाची रक्कम म्हणजे नफा गृहित धरून त्यावर कर आकारणी करण्याचे धोरण प्राप्तीकर विभागाचे होते. देशभरातील सहकारी साखर कारखान्यांना कर वसुलीच्या नोटीसा लागू झाल्याने प्रचंड नाराजी पसरली होती. गेली ३० वर्षे हा प्रश्न प्रलंबित होता. याप्रश्नी राज्यातील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला.

त्यानंतर केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी प्राप्तीकर विभागाला एफआरपी पेक्षा अधिक रकमेवरील प्राप्तीकर आकारणी योग्य नसल्याची सूचना केली होती. त्यावर गतवर्षी २५ ऑक्टोबर रोजी सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेशन (सीबीडीटी) विभागाने परिपत्रकाद्वारे सदर प्राप्तीकर आकारणीचा निर्णय मागे घेतला. तथापि त्यामध्ये सन २०१६ पासून लागू झालेल्या कराचा उल्लेख होता पण त्यापूर्वी झालेल्या कर आकारणीबाबत साशंकता होती. पुन्हा एकदा केंद्रीय सहकार मंत्र्यांचा दरवाजा ठोठावला गेला.

सहकार मंत्री अमित शहा यांच्या सूचनेनुसार ५ जानेवारी रोजी अपर सचिव सौरभ जैन यांनी सुधारित परिपत्रक काढून सर्व सहकारी साखर कारखान्यांचा फरकावरील रकमेवर लागू केलेला प्राप्तीकर रद्द केला आहे.

नव्या निर्णयामुळे एफआरपीपेक्षा जादा दरावरील आकारणी हा नफा नव्हे तर व्यावसायिक खर्च गृहीत धरला जाणार आहे. याच आधारे प्राप्तीकराचे दावे निकाली काढण्याची सूचना परिपत्रकांमध्ये आहे.

नायलॉन मांजाने कापला शिक्षकाचा गळा

वार्ताहर/नागपूर

नागपुरात दुचाकीने जात असलेल्या शिक्षकाच्या गळ्याभोवती नायलॉन मांजा गुंडाळल्याने त्यांचा गळा चिरला. मांजा काढण्याच्या प्रयत्नात शिक्षकाचे बोटही कापले गेले.आशीनगर झोन येथील किदवाई शाळेचे शिक्षक सगीर अहमद हे दुचाकीने घरी जात होते. अचानक त्यांच्यासमोर नायलॉन मांजा आला. दुचाकीचा वेग कमी असल्यामुळे त्यांच्या गळ्याला मांजा अडकला. त्यांनी खबरदारी घेत हाताने मांजा पकडला. तोपर्यंत मांजामुळे त्यांचा गळा रक्तबंबाळ झाला होता. मांजा काढण्याच्या प्रयत्नात त्यांच्या डाव्या हाताच्या बोटालाही जखम झाली.

यूनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking
आन्ध्रा Andhra | कार्पोरेशन Corporation

स्ट्रेस ॲसेट मॅनेजमेंट ब्रांच, हैद्राबाद
३रा मजला, आंध्र बँक बिल्डिंग, सुलतान बाजार, कोटी, हैद्राबाद-५०००९५ दूरध्वनी क्र.: ०४०-२४६८३३१०
ईमेल: bm1204gunion-bankofindia.com

स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या परंतुकासह वाचत सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्व सामान्य जनता आणि विशेषकरुन कर्जदार व जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यांत येते की, युनियन बँक ऑफ इंडिया (तारणी धनको) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ज्यांचा आन्वयिक कब्जा घेतला त्या तारणी धनकोंकडे भाग्रग्रस्त/खालील गहाण स्थावर मिळकतीला खालील कर्जदार आणि जामीनदारांकडून युनियन बँक ऑफ इंडिया ला येणे असलेल्या त्यावरील नंतरचे व्याज, आकार आणि खर्चासह ३१.०१२.२०२१ रोजीसच्या **रु. ९२,०४,४१,६१७.६२ (रुपये ब्याण्णव कोटी चार लाख एकेचाळीस हजार सहाशे सतरा आणि पैसे बासष्ट मात्र)** २९.११.२०१६ दिनांकित मागणी सूचनेनुसार नंतरचे व्याज, आकार व खर्चासह ३१.१०.२०१६ रोजीस ची **रु. ४६,९३,७६,०००/- (रुपये सेहेचाळीस कोटी त्र्याण्णव लाख शहात्तर हजार मात्र)** ची थकबाकी आणि **रु. १०४५.६१ लाख** रकमेची चालू बँक गॅरंटी ज्या रकमेवर बँक आबाहन केल्यावर दावा करू शकते. त्या थकबाकी च्या वसुलीसाठी खालील वर्णन केलेल्या तारखेस **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** तत्त्वाने विकली जाणार आहे. राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम सुद्धा खाली वर्णन केले आहे:

ई-लिलावाची तारीख आणि वेळ: २५.०१.२०२२ व दु. १२.०० पासून दु. २.०० वा. पर्यंत (१० मिनिटांच्या अमर्याद ऑटो एक्स्टेन्शन्स सहित)

कर्जदार आणि जामीनदारांचे नाव	मिळकतीचे मालक आणि परिशिष्ट
कर्जदार: मे. वैष्णोवी इन्फ्राटेक लि. (पूर्वीचे नाव टीएनआर इन्फ्रा प्रोजेक्ट्स लि.), तर्फे त्यांचे मॅनेजिंग डायरेक्टर, थम्मीनेडी गंगाधर राव, हि. क्र. ६-३-३४७/२२२, फ्लॅट क्र. ९, ४था मजला, इश्वर्या निलायम, द्वारकापुरी कॉलनी, पंजागुट्टा, हैद्राबाद-५०००८२, तेलंगणा. **संचालक/सह-कर्जदार/जामीनदार/गहाणकार: १. श्री. थम्मीनेडी गंगाधर राव, टी. नागेश्वर राव यांचे पुत्र,** फ्लॅट क्र. ए-२, रा. क्र. ८-२-६७४/बी/२/२३ए/१५ए, लँडमार्क एन्क्लेव्ह, हॅपी व्हॅली, रोड क्र.१३ए, बंजारा हिल्स, हैद्राबाद-५०००३४, तेलंगणा. **२. श्री. व्ही.व्ही.सुब्बा राव, वीरा राघवुलु चे पुत्र,** घ. क्र. ४२/२९३/१, प्लॉट क्र. २९, फ्लॅट क्र. १०१, बालाजी निवास, मारुती नगर, मौला अली, पोस्ट, हैद्राबाद-५०००६२, तेलंगणा. **३. श्री. के. अजय कुमार, काकरलापुडी तिरुपथी राजू चा पुत्र,** ६-३-५९७, फ्लॅट क्र. १०१, इंदिरा हाईट्स, वेंकट रमना कॉलनी, खैरताबाद, हैद्राबाद-५००००४, तेलंगणा. **४. श्री. व्ही. श्री राम नायडू, व्ही. के. रामास्वामींचा पुत्र,** घ. क्र. ८-२-४६९, फ्लॅट क्र. बी -१, स्नेहा एन्क्लेव्ह, रोड क्र. ५, बंजारा हिल्स, हैद्राबाद -५०००३३, तेलंगणा. **५. श्रीम. के. विजया लक्ष्मी, के. श्रीनिवास राव यांची कन्या, श्री. रामबाबू ची पत्नी,** घ. क्र. ७-१-२९/बी/१३, विद्युत टॉवर्स-II समोर, लीला नगर, अमीरपेट, हैद्राबाद-५०००१६, तेलंगणा. **६. श्री. जी.एन.उदय कुमार, श्री. जी.के. नंदा गोपाल यांचे पुत्र,** रा. २७-१६-२२/५, प्लॉट क्र. ४३, श्री कृष्णा नगर, साफीलगुडा, हैद्राबाद-५०००५६, तेलंगणा. **७. श्रीमती थम्मीनेडी कृष्णा कुमारी, श्री. वीरा राघावुलु यांची कन्या, थम्मीनेडी गंगाधर राव,** फ्लॅट क्र. ए२, घ. क्र. ८-२-६७४/बी/२/२३ए/१५ए, लँडमार्क एन्क्लेव्ह, हॅपी व्हॅली, रोड नं. १३ए, बंजारा हिल्स, हैद्राबाद-५०००३४.	**टीएनआर इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या** नावातील कार पार्किंग सहित ८२० चौ. फू. कार्पोरेट एरिया मोजमापित प्लॉट क्र. ७०, सीटीएस क्र. ई/८९५, खार सबवे जवळ, चर्च ॲव्हेन्यु रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई-४०० ०५४ वेथील **''ॲटलांटा''** नावाच्या इमारतीच्या विंग-ए च्या ६व्या मजल्यावरील निवासी फ्लॅट क्र. ६०२, ज्याच्या **चतुःसीमा:- उत्तरेस:** चर्च ॲव्हेन्यु नावाचा ९० फुटी रोड, **दक्षिणेस:** वेळींग्डन कॅथॉलिक जिमखान्याला भाडेपट्ट्याने दिलेली बांद्रे पालिका जमीन, **पूर्वेस:** वेलींग्डन जिमखाना, **पश्चिमेस:** इस्टेट चा एक हिस्सा असलेली ती जमीन जी स्वर्गीय श्री. जोसेफ सिल्वेरा बोटा यांचा मालकीचा प्लॉट क्र. ७१ आहे.

राखीव किंमत: रु. ३,०८,७०,०००/-, इअर रकम: रु. ३०,८७,०००/-, बोली वाढ मूल्य: रु. ४,००,०००/-

इअर सादर करण्यासाठी अंतिम तारीख: २५.०१.२०२२ ई-लिलाव सुरु होईपर्यंत

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तीसाठी कृपया लिंक **https://ibapi.in** (बँक मिळकतींच्या ई-लिलावासाठी कॉमन लँडींग प्लॅटफॉर्म) आणि **www.unionbankofindia.co.in** ला भेट द्या. नोंदणी आणि लॉगीन व बोली नियमांसाठी **https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp** ला भेट द्यावी.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६)/नियम ९(१) अन्वये विक्री सूचना,
वरील तारखेस ई-लिलाव विक्री आयोजित करण्याबाबत सदर कर्जाच्या कर्जदार आणि जामीनदार यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) / नियम ९(१) अन्वये ही सूचना असल्यासचे ही समजावे.

ई-लिलावाचे आयोजन ई-लिलाव सेवा पुरवठादार **मे. एमएसटीसी लि.** मार्फत केले जाईल.

दिनांक: ०५.०१.२०२२, **सही/-**
ठिकाण: हैद्राबाद **चिफ मॅनेजर आणि प्राधिकृत अधिकारी, युनियन बँक ऑफ इंडिया**

ASREC (India) Limited

इमा. क्र. २, युनिट क्र. २०१-२०२ए आणि २००-२०२बी, तळ मजला, सॉलिटिअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता)

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ नियम (८)१ अन्वये)

ज्याअर्थी,
मूळ धनको भारत को-ऑपरेटीव्ह बँक लि. यांच्याकडून २५ मार्च, २०२१ दिनांकित अभिहस्तांकन कराराद्वारे एएसआरईसी (इंडिया) लिमिटेड, भारत को-ऑपरेटीव्ह बँक लि. चे अभिहस्तांकितीच्या क्षमतेत कार्यरत यांनी तारण कर्ज सह सिक्युरिटीज संपादन केल्या. एएसआरईसी (इंडिया) लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचता कलम १३(२) अन्वये अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसात सूचनेतील नमूद टर्म लोन खाते क्र. ००१८३३५१००६६२७४ करिता **रक्कम रु. ७,३८,०८,७८८.०४/- (रुपये सात करोड अडतीस लाख आठ हजार सातशे अठ्ठ्याऐंशी आणि पैसे चार मात्र)** ३१.०७.२०२१ रोजीस सह दरसाल १३.९०% दराने पुढील व्याज + दरसाल २% दराने दंडात्मक व्याज सह प्रदानाच्या तारखेपर्यंत पुढील व्याज, खर्च, परिव्यय, प्रभार, इ. अशी सूचनेत नमूद रक्कम चुकती करण्यासाठी **कर्जदार/सह-कर्जदार/हमीदार मे. वॅलेंटिनो आर्ट्स/श्री. शिराज अब्दुल हकीम शेख/ श्री. रोनाल्ड मेंडेस (यानंतर कर्जदार असा उल्लेख)** यांना बोलाविण्यासाठी संद क्र. एएसआरईसी/एमयुएम/व्हीए/१३५७/२०२१-२२ दिनांक **१२.०८.२०२१** रोजीची मागणी सूचना निर्गमित केली होती.

भारत को-ऑपरेटीव्ह बँक लि. यांच्याकडून २५.०३.२०२१ दिनांकित अभिहस्तांकन कराराला अनुसरून एएसआरईसी (इंडिया) लि. यांनी वरील उल्लेखित कर्जदारांची वित्तीय मत्ता सह सर्व अधिकार, नामाधिकार आणि हितसंबंध सह सरफैसी ॲक्ट, २०२० च्या कलम ५ अन्वये मुलभूत सिक्युरिटी इंटरेस्ट संपादन केल्या.

कर्जदार/सह-कर्जदार/हमीदार यांनी रक्कम चुकती करण्यामध्ये कसूर केलेली आहे, म्हणून कर्जदार/सह-कर्जदार/हमीदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार एएसआरईसी (इंडिया) लिमिटेड, तारण धनको म्हणून प्राधिकृत अधिकारी यांनी सदर **०५.०१.२०२१** रोजी सदरहू अधिनियमाचे कलम १३(४) सहवाचता सदर रुल्सच्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून यात याखाली वर्णन केलेल्या मिळकतीचा कब्जा घेतलेला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार **एएसआरईसी इंडिया लिमिटेड** यांस **रु. ७,३८,०८,७८८.०४/- (रुपये सात करोड अडतीस लाख आठ हजार सातशे अठ्ठ्याऐंशी आणि पैसे चार मात्र)** ३१.०७.२०२१ रोजीस सह दरसाल १३.९०% दराने पुढील व्याज + दरसाल २% दराने दंडात्मक व्याज सह प्रदानाच्या तारखेपर्यंत पुढील व्याज, खर्च, परिव्यय, प्रभार, इ. च्या प्रभाराच्या अधीन राहील.

कर्जदारांचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात अधिनियमाच्या कलम १३ च्या पोटकलम ८ च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन

गाव पोईसर गावठाण, लेडी फातिमा रोड, लेडी ऑफ रेमेडी चर्चचा मागे, पोईसर, कांदिवली पश्चिम, मुंबई ४०० ०६७ येथे स्थित असलेले आणि सर्व सुविधा असलेले रोणालड मेन्शन, हाऊस क्र. ८०, मोजमापित १६२५ चौ.फू. आणि पालिका नोंदणी क्र. आर-२८०० आणि सिटी सर्व्हे क्र. ७९ येथे स्थित रहिवासीत बंगला. (श्री. रोणाल्ड केन्नेथ मेंडेस यांच्या मालकीचे). सीमाबद्ध द्वारे: पूर्व: प्लॉट सीटीएस क्र. ८० वर बंगला, पश्चिम: प्लॉट सीटीएस क्र. ७७ वर बंगला, उत्तर: रोड, दक्षिण: रोड. **सही/-**

दिनांक: ०५.०१.२०२२ ठिकाण: मुंबई **प्राधिकृत अधिकारी, एएसआरईसी (इंडिया) लिमिटेड**

वैद्यकीय सुविधा सुसज्ज ठेवाव्यात-राऊत

वार्ताहर/नागपूर

ओमायक्रॉन संक्रमितांची वाढती रुग्णसंख्या व कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेपासून बचाव करणे आवश्यक आहे. ऑक्सिजन खाटा, आयसीयू कक्ष, बालकांसाठी स्वतंत्र वार्ड, ऑक्सिजनची उपलब्धता तसेच अनुषंगिक सर्व वैद्यकीय सुविधा सुसज्ज ठेवाव्यात, असे निर्देश नागपूरचे पालकमंत्री डॉ. नितीन राऊत यांनी प्रशासनाला दिले.

नागपूर जिल्ह्यात कोरोनाबाधितांची वाढती संख्या लक्षात घेता पालकमंत्र्यांनी अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयाला (मेयो) भेट दिली.

कोविड वार्ड, खाटांची संख्या, ऑक्सिजन प्लॉंट, मनुष्यबळ आदी बाबींची पाहणी केली. जिल्हाधिकारी आर. विमला, मनपा आयुक्त राधाकृष्णन बी., एम्सच्या संच